**प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय-अहमदनगर यांच्या तहसील - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदीपात्रातील प्रस्तावित सहा वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय -अहमदनगर यांच्या तहसील - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०६ (सहा) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी गुरुवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता तहसील कार्यालय, कोपरगाव, जिल्हा- अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५७/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी - २०१०२३-एफटीएस-००९० दिनांक २८-१०-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - **संयोजक** |

श्री संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर

लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री रेदासनी यांनी असे सांगितले की मप्रनि मंडळास

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय - अहमदनगर यांच्या तहसील - कोपरगाव, जिल्हा- अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०६ (पाच) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३-१२-२०१९ च्या पत्रान्वये वाळू घाट प्रकल्पाला पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी बंधनकारक आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग २ (ब) संवर्गात मोडत आहे. त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक ३०-०९-२०२० रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२०

रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटासंबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, अहमदनगर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर,, तहसीलदार- तालुका कार्यालय-कोपरगाव , जिल्हा - अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालये - राहुरी खुर्द, पिंप्री वळण, चंडकापूर, वळण, रामपुर, सात्रळ वांगी खुर्द, नायगाव -१ व २, मातुलठाण १, मातुलठाण २, मातुलठाण ३, पुणतांबा, रास्तापुर, कोकणठाण, सनवस्तर, सोनारी आणि कोळगाव थाडी, जेऊर कुंभारी व जेऊर पातोडा, सांगवी भुसार, सुरेगाव, गोढेगदाव, , जिल्हा - अहमदनगर, - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पास ०१ (एक) आक्षेप स्थानिक मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सादरहीकरणानंतर सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांसह पर्यावरणविषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यांनी सांगितले की कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण संवत्सर, सोनारी-कोलगवथडी, जेऊर कुंभारी-जेऊर पाटोदा, सांगवी भुसार, सुरेगाव आणि गोधेगाव या सहा वाळूघाटातील वाळूचा लिलाव होणार असून त्याचे एकूण क्षेत्रफळ हे ७.२९ हेक्टर असून उत्खननासाठी वाळूसाठा हा १७,०२७.० ब्रास असून एकूण हातची किंमत रुपये ६,७२,५६,६५०/- एवढी आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्ह्यात १८ वाळूघाटांविषयी जनसुनावणी असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३-१२-२०१९ च्या सूचनेनुसार वाळूघाट उत्खननास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनाबाबत सादरीकरण केलेले आहे. तरी उपस्थितांनी त्यांचे काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

१) <u>श्री शशिकांत रामदास वाबळे, सरपंच, ग्रामपंचायत सुरेगाव, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>

श्री वाबळे यांनी विचारणा केली की नदीपात्र मोकळे असताना सर्वेषण करणे योग्य आहे. तरी येथील सर्वेषण केंव्हा करण्यात आले? सादरीकरणात सांगण्यात आले की संबंधित लिलाव करणा-या वाळूघाटांचे सर्वेषण करण्यात आले. त्यावेळेस उत्तर देण्यात आले की एप्रिल, मे मध्ये सर्वेषण करण्यात आले. त्यावेळी श्री वाबळे यांनी आक्षेप नोंदविला की लॉकडाऊन असताना सर्वेषण कसे करण्यात आले? त्यावेळी मागच्या वर्षी एप्रिल व मेमध्ये सर्वेषण करण्यात आले असे उत्तर देण्यात आले.

त्यावेळी श्री वाबळे यांनी आक्षेप नोंदविला की जर गावात सर्वेषणास आले, तर तेथील तलाठी कार्यालयात, ग्रामपंचायत कार्यालयात त्याची नोंद पाहिजे. आम्हांला कोणतीही नोंद घेण्यात आलेली नसल्याचे समजतेच. त्याचप्रमाणे स्थानिकांच्या माहितीसाठी गावात दवंडी पिटणे आवश्यक होते. तसे काहीही करण्यात आलेले नाही. म्हणजे हे सर्वेषण बोगस आहे.

श्री शशिकांत वाबळे यांनी आक्षेप नोंदविला की झाडे लावण्याचे व इतर आश्वासन देण्यात आलेले आहे, त्याचा अंमलबजावणी होणार याची हमी ग्रामस्थांना देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे जरी ट्रॅक्टरनेच वाहतुक करण्याचे नुसते आश्वासन देण्यात येते. प्रत्यक्षात जेसीबी आणून परवानगीपेक्षा जास्त वाळू अवैधपणे रात्रीच्या वेळी काढण्यात येते. शासनाने अटी व शर्तीचे पालन वाळू कंत्राटदार करतील याचे पत्र द्यावे.

२) <u>श्री सुहास वाबळे, राहणार - सुरेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>

यांनीही लिलाव प्रक्रियेस आक्षेप नोंदविला व अटी व शर्तीचे पालन होत नाही असा आरोप केला. त्यांना त्यांचे निवेदन हे लेखी स्वरुपातही दाखल केले.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रस्तावक यांनी याबाबत स्पष्टीकरण सादरीकरण करताना दिलेले आहे. १०% बरोबरच जी सर्वोच्च बोली असेल, त्यातील स्वामित्व /रॉयल्टीची रक्कम वजा करुन उरलेल्या रकमेच्या २५% रक्कम ग्रामपंचायतीस एक कोटीचा लिलाव असेल तर मिळणार आहे. पुढे जसेजसे वाढत जाईल, त्याप्रमाणे रक्कम मिळेल. ते मात्र टप्पे ठरले आहेत, म्हणजे २५ लाख, ४० लाख वगैरे.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जानेवारी, २०२० च्या शासन निर्णयानुसार उत्खनन करणा-या संस्थेने उत्खनन करताना ऑनलाईन सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्या सर्व उत्खननाची नोंद करण्यात येते. त्यामुळे अवैध उत्खननावर नियंत्रण असेल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

त्याचप्रमाणे शशिकांत वाबळे या लिलावास आमच्या ग्रामपंचायतीने विरोध दर्शविलेला आहे. जर शासनाने निर्णय घेतल्यास, ग्रामस्थ कोर्टात जाणार आहोत.

यावेळी सांगवी भुसार गावाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की त्यांच्या ग्रामसभेने वाळू लिलावास विरोध केलेला आहे. त्याचप्रमाणे वाळूचे संरक्षणही केलेले आहें. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ते मान्य केले.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. तेथील राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती (SEAC-I) याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले. माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

(संजीव रेदासनी )
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
अहमदनगर

(पी. एम. जोशी)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(संदीप निचित, )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर ~~अतिरिक्त~~ जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर,

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय-अहमदनगर यांच्या तहसील - राहाता, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदीपात्रातील प्रस्तावित दोन वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय - अहमदनगर यांच्या तहसील - राहाता, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०२ (दोन) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी गुरुवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय, राहाता, जिल्हा- अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५७/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी - २०१०२३-एफटीएस-००९० दिनांक २८-१०-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - संयोजक |

श्री संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री रेदासनी यांनी असे सांगितले की मप्रनि मंडळास प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय -अहमदनगर यांच्या तहसील - राहाता, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०२ (दोन) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३-१२-२०१९ च्या पत्रानव्ये वाळू घाट प्रकल्पाला पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी बंधनकारक आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग २ (ब) संवर्गात मोडत आहे. त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक ३०-०९-२०२० रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटासंबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, अहमदनगर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर,, तहसीलदार- तालुका कार्यालय-राहाता, जिल्हा - अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालये - राहुरी खुर्द, पिंप्री वळण, चंडकापूर, वळण, रामपुर, सात्रळ वांगी खुर्द, नायगाव -१ व २, मातुलठाण १, मातुलठाण २, मातुलठाण ३, पुणतांबा, रास्तापुर, कोकणठाण, सनवस्तर, सोनारी आणि कोळगाव थाडी, जेऊर कुंभारी व जेऊर पातोडा, सांगवी भुसार, सुरेगाव, गोढेगदाव, , जिल्हा - अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पास ---09---- आक्षेप स्थानिक मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सादरहीकरणानंतर सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांसह पर्यावरणविषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यांनी सांगितले की राहाता तालुक्यातील पुणतांबा व रस्तापूर (गोदावरी नदी) या दोन वाळूघाटातील वाळूचा लिलाव होणार असून त्याचे एकूण क्षेत्रफळ हे ३.७० हेक्टर असून उत्खननासाठी वाळूसाठा हा ८,४०१.० ब्रास असून एकूण हातची किंमत रुपये ३,३१,८३,९५० एवढी आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्ह्यात १८ वाळूघाटांविषयी जनसुनावणी असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३-१२-२०१९ च्या सूचनेनुसार वाळूघाट उत्खननास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनाबाबत सादरीकरण केलेले आहे. तरी उपस्थितांनी त्यांचे काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **डॉ. धनंजय धनवटे, सरपंच, ध्वनी गाव जिल्हा-अहमदनगर-**

सदरहू जनसुनावणी ही गावात घेणे योग्य होते. तालुक्याच्या ठिकाणी घेतल्यामुळे व करोनामुळे बरेच लोक आलेले नाही. आमच्या गावाचा या वाळू लिलावाला विरोध असणार आहे. कारण पूर्वी जे लिलाव झाले, त्यात परवानगी दिलेल्या वाळू उपसापेक्षा अतिजास्त प्रमाणात वाळू ऊपसा झालेला आहे. डंपर, पोकलँड यासारखी साधने वापरली जातात. कधीकधी १०० डंपर वापरले आहेत. त्यामुळे सर्व रस्ते खराब झालेले आहेत. राज्य महामार्ग कोपरगाव रस्ता पूर्णपणे खचलेला आहे. तयार झालेला रस्ता पूर्णपणे खचला आहे. पाणी नसताना वाळू काढणे अपेक्षित आहे. मात्र पाणी असतानाही होडया लावून कित्येक ब्रास वाळू काढली गेलेली आहे. त्यावेळी ग्रामस्थांनी कोरड्या पात्रातील वाळू काढण्याची मागणी केली, तर शेतक-यांना दमदाटी देऊन ओल्या पात्रातून वाळू काढण्यात आली. आमची ग्रामपंचायत वाळूचे संरक्षण करण्यास समर्थ आहे. मात्र वाळू उपसा करणारे गुंडांना हाताशी धरून गावक-यांवर दमदाटी करतात. मागच्यावेळी आमच्या गावातील सरपंचावर जीवघेणा हल्ला झालेला होता. त्यामुळे गावातील लोक विचार करतात की हा वाळूचा लिलाव होऊन गेला तरी चालेल. पण शासनाने घालून दिलेले कडक निर्देश म्हणजे ऑनलाईन कॅमेरा, जीपीएस सयंत्रणा लावणे, वाहनांना बारकोड व इतर सर्व शासनाचे नियम पाळणार असतील, तरच ग्रामपंचायत त्याबाबत विचार करु शकते. पण ज्या पध्दताने वाळूलिलाव होतो, त्या पध्दतीस आमची विरोध आहे.

डॉ. धनंजय धनवटे यांना आरोप केला की लाखो ब्रास वाळू अवैधपणे उचलेली आहे. तरी याबाबत योग्य निर्णय घ्यावा ही इच्छा. त्यांनी मागणी केली की ही जनसुनावणी आमच्या गावात व्हावी.

संयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना विचारणा केली की अजून कोणाला सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते उपस्थित करु शकतात.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित करण्यात आलेले मुद्दे अत्यंत रास्त आहेत. आम्ही त्याची नोंद घेतलेली आहे. व्हिडिओ शुटींग झालेले आहे. त्यांनी सांगितले की जनसुनावणी ही लोकांची मते, भावना जाणून घेण्याची प्रक्रिया आहे. शासनास समाजातील सर्व घटकांचा विचार करावाच लागतो. जरी १९५७ साली गौण खनिज कायदा आला, तरी अशा अटी व शर्ती नव्हत्या. त्यास २०१३ हे साल उजाडावे लागले. आता ग्रामसभेत ठराव मंजूर होणे बंधनकारक आहे. ड्रोन सर्व्हे होणार आहे. जीपीएस बंधनकारक आहे. पर्यावरणाचा विचार आला. मात्र यासही शासन व प्रशासन म्हणून मर्यादा आहेत. त्यामुळे प्रत्येक गावात सुनावणी होणे शक्य नाही. कारण ही जनसुनावणी ही जिल्हादंडाधिकारी यांनी घ्यायची आहे. त्यांच्यावतीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी म्हणून मी काम पहात आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की गावपातळीवर एक दक्षता समिती आहे. सरपंच हे त्याचे अध्यक्ष आहेत. शासन जेव्हा विचार करते, त्यावेळी महसुल मिळणे त्याचबरोबर विकास कामे होणेही गरजेचे आहे हा विचार असतो. मागणी व पुरवठा यात तफावत त्यामुळे ह्या गोष्टी होत आहेत.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रस्तावक यांनी याबाबत स्पष्टीकरण सादरीकरण करताना दिलेले आहे. १०% बरोबरच जी सर्वोच्च बोली असेल, त्यातील स्वामित्व /रॉयल्टीची रक्कम वजा करुन उरलेल्या रकमेच्या २५% रक्कम ग्रामपंचायतीस एक कोटीचा लिलाव असेल तर मिळणार आहे. पुढे जसेजसे वाढत जाईल, त्याप्रमाणे रक्कम मिळेल. ते मात्र टप्पे ठरले आहेत, म्हणजे २५ लाख, ४० लाख वगैरे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. धनंजय धनवटे, सरपंच, ध्वनी गाव सांगितले आपण लोकप्रतिनिधी आहात. आपणास लोकांना निवडून दिलेले आहे. आपल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यात येईल. मात्र आपण दक्षता समितीचे अध्यक्ष असल्याने ग्रामस्थांनी त्यांना काही नियमबाह्य आढळल्यास शासनास ही बाब निर्देशनास आणावी. शासन याबाबत निर्णय घेईल.

सरपंच, ध्वनी गाव डॉ. धनंजय धनवटे, यांनी सांगीतले की लिलाव झाला तर ग्रामपंचायतीतर्फेही त्यावर लक्ष ठेवण्यात येईल. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर

जनसुनावणी समिती यांनी त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून अधिकार आहे असे सांगितले. आपण सर्व अटी व शर्तींचे पालन होते का व त्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार उत्खनन करणा-या संस्थेने उत्खनन करताना ऑनलाईन सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्या सर्व उत्खननाची नोंद करण्यात येते. त्यामुळे अवैध उत्खननावर नियंत्रण असेल.

श्री पी.एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी,मप्रनि मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी अतिशय रास्त मुद्दे मांडले. त्यांनी सांगीतले की ३ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार वाळू लिलाव अटी व शर्तीसह राबविणे बंधनकारक आहे. शासनाने पारदर्शक धोरण तयार केलेले आहे. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ (जी) नुसार प्रत्येक नागरिकाचे पर्यावरण संरक्षण करणे ही जबाबदारी आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली

आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. तेथील राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती (SEAC-I) याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

(संजीव रेदासनी )
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
अहमदनगर

(पी. एम. जोशी)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(संदीप निचित, )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर,

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय-अहमदनगर यांच्या तहसील - राहुरी, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदीपात्रातील प्रस्तावित पाच वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय -अहमदनगर यांच्या तहसील - राहुरी, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील प्रस्तावित नदी पात्रातील ०५ (पाच) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी मंगळवार, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय, राहुरी, जिल्हा- अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५७/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी - २०१०२३-एफटीएस-००९० दिनांक २८-१०-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - **संयोजक** |

श्री संदीप निचित, ~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी-अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करून तहसील

कार्यालयात् जनसुनावणीचा पुकार करणा-या कर्मचा-याचे शुटींग घेण्याचे आदेश दिले. त्यांनी समन्वयक यांना बैठक सुरु करण्याची सूचना दिली.

श्री संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री रेदासनी यांनी असे सांगितले की मप्रनि मंडळास

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय - अहमदनगर यांच्या तहसील - राहुरी, जिल्हा- अहमदनगर, महाराष्ट्र येथील प्रस्तावित नदी पात्रातील ०५ (पाच) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३-१२-२०१९ च्या पत्रानव्ये वाळू घाट प्रकल्पाला पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी बंधनकारक आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग २ (ब) संवर्गात मोडत आहे. त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य. जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक ३०-०९-२०२० रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटासंबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, अहमदनगर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर,, तहसीलदार- तालुका कार्यालय-राहुरी, जिल्हा - अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालये - राहुरी खुर्द, पिंप्री वळण, चंडकापूर, वळण, रामपुर, सात्रळ वांगी खुर्द, नायगाव -१ व २, मातुलठाण १, मातुलठाण २, मातुलठाण ३, पुणतांबा, रास्तापुर, कोकणठाण, सनवस्तर, सोनारी आणि कोळगाव थाडी, जेऊर कुंभारी व जेऊर पातोडा, सांगवी भुसार, सुरेगाव, गोढेगदाव, , जिल्हा - अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पास ---09---- आक्षेप स्थानिक मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सादरहीकरणानंतर सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांसह पर्यावरणविषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यांनी सांगितले की राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द, पिंप्री वळण-चंडकापूर, वळण, रामपूर व सात्रळ या पाच वाळूघाटातील वाळूचा लिलाव होणार असून त्याचे एकूण क्षेत्रफळ हे ८.७१ हेक्टर असून उत्खननासाठी वाळूसाठा हा १७,७८९.० ब्रास असून एकूण हातची किंमत रुपये ७,०२,६६,५५० एवढी आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्ह्यात १८ वाळूघाटांविषयी जनसुनावणी असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३-१२-२०१९ च्या सूचनेनुसार वाळूघाट उत्खननास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनाबाबत सादरीकरण केलेले आहे. तरी उपस्थितांनी त्यांचे काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

यावेळी तहसीलदार श्री शेख राहुरी व उप विभागीय अधिकारी अनिल पवार हेही उपस्थित होते. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करताना सांगितले की आजची सुनावणी ही पर्यावरणविषयक सुनावणी आहे. वाळू उत्खननामुळे पर्यावरणास म्हणजे हवा, पाणी, नदीपात्र यांना काही धोका होईल का असे आपणास वाटत असेल तर आपण त्याबाबत सूचना देऊन शकता.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री प्रमोद तुकाराम बोरावके, गाव- आरड, तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-</u>

सादरीकरणात सांगितले की वाळू ही ट्रॅक्टरने वाहून नेण्यात येईल. पण वाळू ही ट्रॅक्टरनेच कुठे केली जाते? मोठ्या गाडया वापरल्या जातात. ज्या गावातून वाहतुक होते, त्या गावांनाच त्रास होतो. भविष्यात आम्हांला खराब रस्त्याचा त्रास होणार. त्यावेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा प्रकल्प प्रस्तावक यांनी सांगितले की

नदीपात्रात फक्त ट्रॅक्टर वापरणार. इतर ठिकाणी वाळू नेताना आ.टी.ओ. नियमांप्रमाणेच वाहतुक करण्यात येईल. त्यावेळी उपस्थितांनी सांगितले की गावातील रस्ते पूर्णपणे मोठ्या गाड्यांमुळे उखडले आहेत. ज्या गावांचे त्रास होतो, त्यांना काहीतरी मोबदला मिळायला हवा.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की वाळू लिलाव अधिनियमांनुसार १०% ते २५% त्या गावाला निधी मिळतो. त्यावेळी श्री बोरावके यांनी आक्षेप नोंदविला की ज्या गावातून वाळू उचलली जाते, त्या गावास १०% निधी मिळावा, कारण त्या गावातील रस्ते पूर्णपणे खराब होतात.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रस्तावक यांनी याबाबत स्पष्टीकरण सादरीकरण करताना दिलेले आहे. १०% बरोबरच जी सर्वोच्च बोली असेल, त्यातील स्वामित्व /रॉयल्टीची रक्कम वजा करुन

उरलेल्या रकमेच्या २५% रक्कम ग्रामपंचायतीस एक कोटीचा लिलाव असेल तर मिळणार आहे. पुढे जसेजसे वाढत जाईल, त्याप्रमाणे रक्कम मिळेल. ते मात्र टप्पे ठरले आहेत, म्हणजे २५ लाख, ४० लाख वगैरे.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जानेवारी, २०२० च्या शासन निर्णयानुसार उत्खनन करणा-या संस्थेने उत्खनन करताना ऑनलाईन सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्या सर्व उत्खननाची नोंद करण्यात येते. त्यामुळे अवैध उत्खननावर नियंत्रण असेल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

२) **श्री धनंजय इंगळे, संगमनेर, जिल्हा-अहमदनगरः-**

अशीही गावे आहेत की त्यांचे ठराव आलेले नाहीत. जर त्यांचे तसे ठराव आले, तर आपण घेणार का?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पूर्वी त्यांनी विरोध दर्शविला आणि आता त्यांची तयारी आहे. त्यासाठी पुढील कार्यवाहीसाठी प्रांताधिकारी यांना सांगण्यात आलेले आहे. अशी ३२ गावे आहेत.

उपस्थितांपैकी श्री बोरावके यांनी उत्खननास सकाळी ६ ते संध्याकाळी ६ परवानगी असते, तर वाहतुकीस काहीही वेळेचे बंधन आहे का याबाबत विचारणा केली. त्यावेळी प्रकल्प प्रस्तावक यांनी सांगितले की शासनाच्या निर्देशांनुसार दोन्हीसाठीही सकाळी ६ ते रात्री ६ हेच वेळेचे बंधन आहे.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. तेथील राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती (SEAC-I) याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले. माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| (संजीव रेदासनी ) | (पी. एम. जोशी) |
| संयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| मप्रनि मंडळ, | मप्रनि मंडळ, |
| अहमदनगर | नाशिक |

(संदीप निचित, )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर,

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय-अहमदनगर यांच्या तहसील - श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदीपात्रातील प्रस्तावित पाच वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय - अहमदनगर यांच्या तहसील - श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०५ (पाच) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी मंगळवार, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता तहसील कार्यालय, श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५७/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी - २०१०२३-एफटीएस-००९० दिनांक २८-१०-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(~~अतिरिक्त~~ अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **संयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहमदनगर

श्री संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री रेदासनी यांनी असे सांगितले की मप्रनि मंडळास
प्रकल्प प्रवर्तक जिल्हाधिकारी कार्यालय -अहमदनगर यांच्या तहसील - श्रीरामपुर, जिल्हा- अहमदनगर, महाराष्ट्र येथील नदी पात्रातील प्रस्तावित ०५ (पाच) वाळूघाटाचे वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३-१२-२०१९ च्या पत्रानव्ये वाळू घाट प्रकल्पाला पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी बंधनकारक आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग २ (ब) संवर्गात मोडत आहे. त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि

मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक ३०-०९-२०२० रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटासंबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, अहमदनगर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर,, तहसीलदार- तालुका कार्यालय-श्रीरामपूर, जिल्हा - अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालये - राहुरी खुर्द, पिंप्री वळण, चंडकापूर, वळण, रामपुर, सात्रळ वांगी खुर्द, नायगाव -१ व २, मातुलठाण १, मातुलठाण २, मातुलठाण ३, पुणतांबा, रास्तापुर, कोकणठाण, सनवस्तर, सोनारी आणि कोळगाव थाडी, जेऊर कुंभारी व जेऊर पातोडा, सांगवी भुसार, सुरेगाव, गोढेगदाव, , जिल्हा - अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पास ---07--- आक्षेप स्थानिक मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सादरहीकरणानंतर सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाययोजनांसह पर्यावरणविषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यांनी सांगितले की श्रीरामपुर तालुक्यातील वांगी खुर्द (प्रवरा नदी), नायगाव - १ व २ (गोदावरी नदी), मातुलठाण क्रं-१, २ व ३ (गोदावरी नदी) या पाच वाळूघाटातील वाळूचा लिलाव होणार असून त्याचे एकूण क्षेत्रफळ हे ११.९५ हेक्टर असून उत्खननासाठी वाळूसाठा हा २६,६५०.० ब्रास असून एकूण हातची किंमत रुपये १०,५२,६७,५००/- एवढी आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्ह्यात १८ वाळूघाटांविषयी जनसुनावणी असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३-१२-२०१९ च्या सूचनेनुसार वाळूघाट उत्खननास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनाबाबत सादरीकरण केलेले आहे. तरी उपस्थितांनी त्यांचे काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

यावेळी उप विभागीय अधिकारी अनिल पवार हेही उपस्थित होते. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करताना सांगितले की आजची सुनावणी ही पर्यावरणविषयक सुनावणी आहे. वाळू उत्खननामुळे पर्यावरणास म्हणजे हवा, पाणी, नदीपात्र यांना काही धोका होईल का असे आपणास वाटत असेल तर आपण त्याबाबत सूचना देऊन शकता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ज्या ज्या ग्रामसभेने ठराव संमत केले, त्या त्या गावातच वाळू उपसा होणार आहे. यात आपण पर्यावरणीय प्रश्न असल्यास ते उपस्थित करावेत. त्याची नोंद घेण्यात येईल व त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री राजाराम नारायण राशिनकर, राहणार-नायगाव,तालुका-श्रीरामपुर, जिल्हा-अहमदनगरः-</u>

ही जनसुनावणी प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे. येथून १८ कि.मी.,आमचे गाव गोदावरी नदीकिनारपट्टीच्या क्षेत्रात असून त्याचे क्षेत्रफळ चुकीचे दाखविलेले आहे. त्याचप्रमाणे जानेवारी, २०२० मध्ये आमच्या गावाच्या ग्रामसभेने वाळूलिलावास परवानगी दिलेली आहे. त्यास नऊ महिने उलटून गेले. शिवाय करोनाचे संकट असताना इतक्या मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाळूचा भरमसाठ प्रमाणात ऊपसा झाला. तेथील स्थानिक शेतकरी हे दबावाखाली जगत आहेत. कारण कुठलीही शासन यंत्रणा, पोलिस आमचे संरक्षण करु शकले नाही, व आज जनसुनावणीत आपण लिलाव करु, जेवढे उपसा करता येईल, तेवढीच वाळू ऊपसा होईल, झाडे लावू, पर्यावरण योजना राबू असे म्हणता. मी गेले ३० वर्षे पर्यावरणात काम करत असून नाशिक ते पैठण येथे पर्यावरण समृध्दीसाठी आम्हा लोकांना भेटलो असून लोकांनीही आम्हांला सहकार्य केलेले आहे. त्यामुळे वाळूसाठा आम्ही ठेऊ शकतो. वाळू हे इतरांना बांधकामासाठी एक साधन आहे. मात्र अनेक जलचर वाळूत अंडे घालतात. खेकडे असतात. शेवाळे असतात. त्यांचे जैवसंवर्धन झालेले असते. वाळू लिलावामुळे त्यांच्या जैवसंवर्धनावर हल्ला होणार आहे. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की जरी शासकीय नियमांप्रमाणेच जरी करार झाला, तरी कंत्राटदार अवैधपणे ऊपसा घेतात. त्याबाबत केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात येत नाही. त्याचप्रमाणे ट्रॅक्टर बरोबरच डंपर व जेसीबी मशिन्स येतात. तरी लिलावाची नियमावली पाळली नाही तर आम्ही काय करु

शकतो ह्या बाबत जनतेस सांगणे आवश्यक आहे. आमच्या गावातील १८ कि.मी. रस्ता आहे. गावात अंतर्गत रस्ते आहेत. ते सर्व या वाहनांमुळे पूर्णपणे खराब झालेले आहेत.

आपण सांगाल की गावक-यांची एक समिती तयार करा. पण आमच्या गावातील समितीस जर आपले संरक्षण असेल, तरच ती वाळूचे संवर्धन करु शकते. तरी याबाबत आपण गांभिर्याने विचार करावा अशी विनंती आहे. आपले मार्गदर्शन आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे नायगावचे मापन चुकीचे आहे. गोदावरी ही उत्तर-दक्षिण दिशेने पाच कि.मी. व परत दक्षिण-उत्तर दिशेने दोन कि.मी. असे क्षेत्र आहे. त्याबाबत योग्य ते क्षेत्र लिहावे.

२) <u>श्री कैलास भागवत बोरडे, राहणार - मातुसा, तालुका-श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगरः-</u>

त्यांनी श्री राशिनकर यांनी सर्व गावक-यांची बाजू घेतली म्हणून त्यांचे आभार मानले. त्यांनी विचार मांडले की ही वाळू ही राष्ट्राची संपती आहे. निसर्गात वाळू निर्माण करण्याची प्रक्रिया चालू असते व शासनाचे धोरण ती बांधकामाच्या वापरासाठी वापरणे अशी आहे. मात्र प्रत्येक वेळी लिलावाच्या अटी व शर्ती यांचे पालन होत नाही. नियम डावलून अतिरिक्त वाळू उपसली जाते. त्याने पर्यावरणाला खिळ बसते. त्यामुळे जेथे जेथे वाळूचा लिलाव घोषित होतो, त्या प्रत्येक ठिकाणी विरोध होतो. ०३ फुटापर्यंत उपसाची परवानगी असली तरी गट नंबर व्यतिरिक्त व खडकापर्यंत उपसली जाते. वाळू भरल्याच्या पावत्या दिल्या पाहिजेत. क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहनांमध्ये भरली जाते. ट्रॅक्टर, जेसीबी, मोठे ट्रॅक्स यामुळे गावातील रस्ते पूर्ण खराब होतात.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविताना सांगितले की शासनास महसुल मिळतो, म्हणून वाळूचा लिलाव केला जातो, तर रस्ते खराब होतात. गावात एकच रस्ता असतो. सर्वात जास्त त्रास गावातील लोकांना होतो. तो परत दुरुस्त करण्यात शासनाचेच नुकसान आहे. म्हणजे एकीकडे महसुल घेण्यासाठी वाळूचे उत्खनन करायचे व दुसरे ठिकाणी कोटी रुपयांचे रस्ते खराब करुन तो दुरुस्त करायचा. यात शासनाचेच जास्त नुकसान आहे. म्हणून वाळू वाहतुकीसाठी दुसरा कच्चा रस्ता तयार करुन द्यावा. झाडे लावण्याचे आश्वासन देतात. प्रत्यक्षात काहीही दिसत नाही. शासनाच्या धोरणाप्रमाणे जर वाळू

लिलावास विरोध केला, तर वाळूचे संरक्षणही ग्रामस्थांनी करणे बंधनकारक आहे. मात्र येथे समाजातील काही लोक असे असतात की त्यात त्यांचा फायदा असतो, त्यामुळे गरीब ग्रामस्थ वाळूचे संरक्षण करु शकत नाही. तरी शासनाच्या नियमांचे पालन व्हावे अशी मी अधिका-यांना विनंती करतो.

३) **<u>श्री सतीश सूर्यभान बोरडे, राहणार- मातुसा, तालुका-श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

सादरीकरणात लिलावाच्या अटी व शर्ती दाखविण्यात आल्या. वाचूनही दाखविल्या. नियम हे जनहिताचे व पर्यावरण संरक्षणाचे आहेत, त्याबाबत आमची तक्रार नाही. परंतु आमचा असा अनुभव आहे की परवानगीपेक्षा अवैधपणे ब-याच प्रमाणात वाळूचा ऊपसा होतो. आमच्या भागातील वाळू लिलाव करताना जर अटी व शर्तींचे उल्लंघन होत असेल, तर त्यास आमचा विरोध असेल. आम्ही वाळुचे संरक्षण केलेले आहे. बुलडोझर लावून खड्डे बुझविले जातात. पलिकडच्या बाजूने वाळूचा साठा ब-याच प्रमाणात काढला. आम्ही त्यास विरोध केला, तर आमच्या घरी पोलिस पाठविले. तरी आमचा विरोध कायम राहणार आहे.

४) **<u>श्री दिलीपभाऊ जगताप, सरपंच, वांगीखुर्द ग्रामपंचायत, जिल्हा-अहमदनगर -</u>**

त्यांनी सांगितले की गट नं. ३ व ४ यांनी विरोध केला. आता समजले की लिलावातील काही रक्कम ग्रामपंचायतीस मिळणार आहे. तरी त्याचा परतावा आम्हांला मिळावा ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की नायगाव, मातुलठाण व वांगी यांनी महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. त्याची नोंद घेण्यात आलेले असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की लोकशाहीतील ही एक जनहित प्रक्रिया आहे. सर्वांचे हित पाहण्यासाठीच ती आहे. वाळू ह्या गौणखनिजाला मागणी व पुरवठा याची सांगड घालणे गरजेचे आहे. जरी १९५७ ला कायदा संमंत झालेला असला तरी त्यास योग्यप्रकारे अंमलबजावणीसाठी २०१३ साल उजाडले. येथे उपस्थित करण्यात आलेल्या

आक्षेपांत एकच सिध्द होते की कोणालाही अवैध उत्खनन नको आहे. नोंदविण्यात आलेले आक्षेप हे नाकारता येत नाहीत.

मात्र आता नविन निर्देशांनुसार ड्रोनने उत्खनन करताना लक्ष ठेवणे, गाड्यांना जीपीएस सयंत्रणा लावणे, गाडयांना बारकोड लावणे असे कडक निर्बंध आलेले आहेत. त्याचप्रमाणे ग्रामदक्षता समिती स्थापन करायची आहे. जरी किंमत ३,९५० ब्रास असली तरी ती अंतिम नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी चांगली चर्चा केली. वृक्षारोपण करण्याचे निर्देश अटी व शर्तींमध्ये आहे.

चर्चेत झालेल्या विविध मुद्यांनुसार अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी ग्रामपंचायतीस वाळू लिलावातील अटी व शर्ती फ्लेक्स बोर्डवर लावण्याच्या सूचना देण्यात येतील असे आश्वासन दिले.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. तेथील राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती

(SEAC-I) याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

( संजीव रेडासनी )
संयोजक,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिति
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
अहमदनगर

(पी. एम. जोशी)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(संदीप निचित, )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर ~~अतिरिक्त~~ जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर,



Shrirampur